दैनिक

# लोक आरंभ

wwww.lokaarambh.com

संपादक: राहुल मारोतीराव वाईकर

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

बीड | वर्ष - ०४ थे | अंक १०९ | गुरुवार ९ एप्रिल २०२६ | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | पान ४ | किंमत २ रू

Beed | year - ०4 th | Issue109 | Thursday 9 April 2026 | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | Page 4 | Price 2

# सीजफायरचं श्रेय पाकिस्तानला जाताच राऊत खूप जिव्हारी लागणारं बोलले, जयशंकर माकड, मोदी टेलिफोन ऑपरेटर

## तर टेलिफोन ऑपरेटरच काम केलं

“भारताची अवस्था या काळात मोदींमुळे डरपोक उंदरासाखी झाली आहे. इतक्या मोठ्या घडामोडी आशिया खंडात घडत असताना हिंदुस्थानचे पंतप्रधान काय करत होते, तर टेलिफोन ऑपरेटरच काम केलं. युद्ध थांबवण्याचं श्रेय पाकिस्तानला मिळालं. ज्या पाकिस्तानबद्दल बोलताना जयशंकर म्हणाले की, आम्ही दलाल राष्ट्र नाही. त्या दलाल राष्ट्राला ट्रम्प यांनी युद्ध थांबवण्याचं श्रेय दिलं. जयशकंर यांनी राजीनामा दिला पाहिजे. तुम्ही आपल्या शत्रुला कमी लेखताय. जयशंकर सारखी माकडं आहेत. त्यांना दूर केल पाहिजे त्यांच्यामुळे नाचक्की झाली आहे” अशी टीका संजय राऊत यांनी केली.

“संपूर्ण जगाचा विद्धवंस होईल अशा पद्धतीच हे युद्ध सुरु होतं. हजारो लोक मारले गेले. आखाती राष्ट्रामधल्या दुबई, कुवैत, बहरीन, इस्रायल अशा अनेक ठिकाणी शेकडो लोकं मारली गेली. पण इराण सारखा देश हा इस्रायल आणि अमेरिकेसारख्या महाशक्तींना शरण गेला नाही. 35 दिवसापेक्षा जास्त काळ अमेरिका, इस्रायलला झुंजवत ठेवलं. अमेरिका, इस्रायलविषयी जी फालतू भिती होती ती इराणने मोडून काढली. देशासाठी कसं लढावं, राज्यकर्त्यांनी, जनतेने कसं बलिदान करावं हे इराणने जगाला दाखवून दिलं” असं संजय राऊत म्हणाले. “तरीही इराणचं नुकसान झालं. इस्रायलच त्याहून जास्त नुकसान झालं. अमेरिकेच्या ट्रम्प सारख्या झुंड राष्ट्रप्रमुखाला धडा शिकवला. पण



शेवटी युद्धात मध्यस्थी करण्याचं श्रेय पाकिस्तानला जातय. चीन मोठा देश आहे. पाकिस्तानला श्रेय जातय. पाकिस्तान पुन्हा एकदा जगाच्या नकाशावर आला आहे या निमित्ताने” असं संजय राऊत म्हणाले. “हे श्रेय नरेंद्र मोदींनी घ्यायला पाहिजे होतं. हे श्रेय भारताला मिळायला पाहिजे होतं. महाविश्वगुरुला मिळायला पाहिजे होतं. ट्रम्प, इराणचे राज्यकर्ते आणि इस्रायलचे नेतन्याहू यांना आम्ही एकाटेबलावर आणलं. जगाला शांततेचा संदेश दिला. हे श्रेय आमच्या महाविश्वगुरुंना का मिळाल नाही? कारण त्यांना कोणतीची भूमिका नाही. जगात युद्ध सुरु आहे आणि महाविश्वगुरु केरळ, पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू या ठिकाणी आपल्या राजकीय विरोधकांवर बॉम्ब टाकत होते. शब्द, तोंडी बॉम्ब टाकत होते” अशा शब्दात राऊत यांनी पंतप्रधान मोदींवर टीका केली. तर टेलिफोन ऑपरेटरच काम केलं “भारताची अवस्था या काळात मोदींमुळे डरपोक उंदरासाखी झाली आहे.

# माका येथे श्रृंगऋषीगडाच्या नारळी सप्ताहाचे ध्वजारोहण उत्साहात २४ एप्रिलपासून सात दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

गेवराई : प्रतिनिधी

गेवराई आणि शिरुर कासार तालुक्याच्या सिमेवर असलेल्या श्रृंगऋषीगडाचा यावर्षी दुसरा नारळी सप्ताह नेवासा तालुक्यातील माका येथे होत आहे. या सप्ताहाचे ध्वजारोहण गुरुवर्य भास्करगिरी महाराज, गोवत्स गुरुवर्य राधाकृष्ण स्वामी महाराज, गुरुवर्य आदिनाथ महाराज शास्त्री, महंत जनार्धन स्वामी महाराज यांच्यासह विविध संत-महंतांच्या शुभहस्ते व हजारो भाविकांच्या उपस्थितीत अत्यंत भक्तीमय वातावरणात संपन्न झाले.

ध्वजारोहण झाल्यानंतर टाळ मृदुंगाच्या गजरात व फटाक्यांच्या आतीषबाजीमध्ये व सजावट केलेल्या रथामध्ये संत-महंतांची गावातून यथोचित मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गावात ठिकठिकाणी संत-महंतांचे औक्षण व सन्मान करण्यात आला. या मिरवणुकीने परिसराचे लक्ष वेधून



घेतले होते. या मंगल प्रसंगी परिसरातील भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाचा जयघोष आणि भक्तीपूर्ण वातावरणात विधिवत पूजाअर्चा करून हा पवित्र ध्वज उभारण्यात आला. या नारळी सप्ताहाच्या निमित्ताने २४ एप्रिलपासून सात दिवस माका येथे विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

पहाटेची काकड आरती, श्री गणेश महाराज वारंगे यांची श्रीमद् भागवत कथा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. तसेच ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवत ग्रंथराज पारायण, गाथा भजन, नामवंत किर्तनकारांची सुश्राव्य कीर्तने व प्रवचने, हरिजागर अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ध्वजारोहणाच्या या सोहळ्यामुळे संपूर्ण माका आणि परिसरातील गावांमध्ये भक्तीचे आणि उत्साहाचे वातावर निर्माण झाले आहे. दरम्यान सप्ताहाच्या काळात दररोज सकाळी व सायंकाळी अन्नदानाचे भव्य असे आयोजन केले असून परिसरातील भाविक भक्तांनी या सप्ताहात मोठ्या संख्येने सहभागी होऊन दर्शन, कीर्तनश्रव व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रृंगऋषीगड संस्थानचे गुरुवर्य महंत सुरेशानंद महाराज, सप्ताह समिती आणि ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

## आरोग्य हीच खरी संपत्ती -- डॉ. बप्पासाहेब चावरे



प्रतिनिधी प्रदीप पोटफोडे

पाचोड दि. ८ : आरोग्य हीच खरी संपत्ती ही म्हण केवळ ऐकण्यापुरती नसून मानवी जीवनाचा गाभा आहे. निरोगी शरीर, शांत मन व समाज सुदृढ असेल तरच व्यक्ती, कुटुंब आणि राष्ट्र यांची प्रगती साध्य होते असे प्रतिपादन दिपक हास्पिटलचे डॉ. बप्पासाहेब चावरे यांनी केले. शिवछत्रपती महाविद्यालयात जागतिक आरोग्य दिनानिमित्त (दि. ७) प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी वे टू हेल्थ लॅबोरेटरीचे संचालक विश्वंभर लोहगळे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे हे होते. प्रारंभी मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देवून यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की दरवर्षी ७ एप्रिल हा दिवस जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक नसून तो संपूर्ण मानवजातीला आरोग्याविषयी सजग करणारा, जीवनशैलीचा पुनर्विचार करण्यास भाग पाडणारा आणि निरोगी व सशक्त समाज घडविण्याचा संकल्प करण्याचा विशेष दिवस आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गांधी बानायत यांनी केले तर सुत्रसंचलन डॉ. हेमंतकुमार जैन यांनी केले आणि उपस्थितांचे आभार डॉ. उत्तम जाधव यांनी मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव, डॉ. विलास महाजन, प्रा. संदिप सातोनकर, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर जयंती सणाच्या निमित्ताने सर्व शिक्षकांचे वेतन 10 एप्रिल पर्यंत खात्यात जमा करा

## विनाअनुदानित शाळा कृती समितीचे शिक्षणाधिकारी पाटील मॅडम यांना निवेदन



बीड दि.६ (प्रतिनिधी)- क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सणाच्या निमित्ताने बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्च -२०२६ चे वेतन १० एप्रिल पर्यंत त्यांच्या खात्यात जमा करावे अशी मागणी ‘बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समिती’च्या वतीने बीड शिक्षणाधिकारी पाटील मॅडम यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सण तोंडावर आलेला असताना बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचे वेतन त्यांच्या खात्यात अद्याप जमा झालेले नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शिक्षकांना फुले आंबेडकर जयंती सण कसा साजरा करावा याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ऐन सणासुदीच्या काळात ही समस्या अधिक गंभीर ठरत आहे. या जयंती सणाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने सहानुभूतीपूर्वक विचार करून जिल्ह्यातील शिक्षकांचे मार्च -२०२६ चे वेतन जयंतीपूर्वी, म्हणजेच १० एप्रिलपर्यंत त्यांच्या बँक खात्यात जमा करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे केली. यावेळी शिक्षणाधिकारी श्रीमती पाटील मॅडम यांनी विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी बोलताना त्यांनी संच मान्यता आणि शिक्षक समायोजनाचा प्रश्न मार्गी लागण्याची प्रकिया सुरू आहे. सदरील प्रक्रिया १० एप्रिल पर्यंत पूर्ण होईल. ही प्रक्रिया पूर्ण होताच सर्व शिक्षकांच्या खात्यावर वेतन जमा करणार असल्याचे सांगितले. या निवेदनावर जितेंद्र डोंगरे, आत्माराम वाव्हळ, तुकाराम खाडे, प्रा. सोनवणे, अशोक मोरे, सुभाष मोरे, अभिमन्यू बोरखेडे, शिवप्रसाद सिरसाट, प्रा. ढास आणि प्रा. मस्के आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेच्या गेवराई तालुकाध्यक्षपदी निहाल नौशाद सय्यद यांची निवड



गेवराई (प्रतिनिधी) : सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रियपणे कार्य करणारे गेवराई येथील निहाल नौशाद सय्यद यांची सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटना, बीड जिल्हा यांच्या वतीने गेवराई तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे गेवराई तालुक्यातील युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सामाजिक प्रश्नांची चांगली जाण व समाजासाठी सातत्याने कार्य करण्याची तळमळ लक्षात घेऊन ही निवड करण्यात आली आहे. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मा. अझरुद्दीन भाई सय्यद यांच्या मान्यतेने तसेच मराठवाडा अध्यक्ष मा. दानिश भाई कुरेशी यांच्या सूचनेनुसार बीड जिल्हाध्यक्ष सद्दाम भाई पठाण यांनी निहाल नौशाद सय्यद यांची गेवराई तालुकाध्यक्षपदी निवड जाहीर केली. या निवडीबद्दल विविध सामाजिक, राजकीय व युवक संघटनांकडून निहाल नौशाद सय्यद यांचे अभिनंदन करण्यात येत आहेत.

# महाराष्ट्र भूषण पुरस्काराने प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांचा गौरव

प्रतिनिधी प्रदीप पोटफोडे

पाचोड : शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड येथील प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, प्रशासकीय तसेच कला क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुणे येथील आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन यांच्या वतीने राज्यस्तरीय “महाराष्ट्र भूषण पुरस्कार” नुकताच प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

डॉ. कोठावळे हे गेल्या चार वर्षांपासून शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड येथे प्राचार्य म्हणून कार्यरत असून त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने उल्लेखनीय प्रगती साधली आहे. त्यांच्या कार्यकाळात महाविद्यालयाचे यशस्वी NAAC (नेक) मूल्यांकन, भौतिक व शैक्षणिक विकास, तसेच संस्थेची राज्यभर वाढलेली प्रतिष्ठा ही त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देणारी ठरली आहे.

हा पुरस्कार सोहळा आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मा. गणेश विटकर आणि सचिव तेजस्विनी दिवटे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. या प्रसंगी विविध मान्यवरांनी



उपस्थित राहून डॉ. कोठावळे यांचे अभिनंदन केले.

या यशाबद्दल छत्रपती संभाजी नगरचे खासदार तथा श्री ज्ञानेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव मा. संदीपान भुमरे, संस्था अध्यक्ष मा. राजू नाना भुमरे, श्रीक्षेत्र पैठण चे आमदार विलास भुमरे, जिल्हा परिषद सदस्य तसेच छत्रपती संभाजी नगर चे जिल्हा परिषद सदस्य तथा संस्थेचे संचालक शिवराज भुमरे आदींनी डॉ. कोठावळे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

डॉ. चंद्रसेन कोठावळे यांच्या या यशामुळे शिवछत्रपती महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली असून परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
लोकआरंभ
गुरुवार ९ एप्रिल २०२६
www.lokaarambh.com



सं पा द की य

## धूळ म्हणजेच माती ? "

प्रशांत बाफना जिल्हा प्रतिनिधी 8055440385

." धूळ म्हणजेच माती ? या प्रश्नार्थक शिर्षकाचे एका शब्दात उत्तर द्यायचं असेल तर ते " नाही " असे लेखात नमूद करून त्याची कारणमीमांमा तपशीलात विशद करणाऱ्या या अभ्यासपूर्ण व ज्ञानवर्धक लेखाचा सुसूत्र,सविस्तर गोषवारा असा:—

धूळ आणि मातीमध्ये फरक असला तरी त्यांचा एकमेकांशी संबंधही आहे.जेव्हा क्रियाशील असलेली माती काही कारणामुळे निष्क्रिय होते तेव्हा तिचं नकोसं वाटणारं रूप म्हणजे धूळ.धूळ तयार होण्यासाठी लागणाऱ्या अनेक घटकांपैकी माती हा एक महत्त्वाचा घटक असतो,पण धुळीपासून माती तयार होत नाही. कारण धूळ ही मृत किंवा निष्क्रिय असते, पर्यावरणाचा आवश्यक घटक नसते; किंबहुना ती हवा,पाणी आणि जमिनीच्या प्रदूषणाला कारणीभूत ठरते.

सूर्यप्रकाश,वारा आणि पाणी यांच्या माऱ्याने आणि आपल्यासारख्या सजीवांच्या काही क्रियांमुळे,पृथ्वीच्या पृष्ठभागावरच्या दगडांचं घर्षण होऊन झीज होते.यातून निर्माण होणाऱ्या बारीक कणांना माती म्हणतात.दिवसा सूर्यप्रकाशामुळे दगड गरम होऊन प्रसरण पावतात आणि रात्रीच्या वेळी हे दगड थंड होऊन आकुंचन पावतात.

त्यामुळे दगडांना तडे जाऊन ते फुटतात. पाऊस,बर्फ आणि वाऱ्याचा खडकावर आघात झाल्यामुळे दगडांचे कण सुटे होऊन त्यांची झीज होते.या शिवाय खडकांच्या फटीमध्ये जी झाडं वाढतात,त्यांच्या मुळांमध्ये खडक फुटून त्यांचं मातीमध्ये रूपांतर होतं.शिवाय नद्या वाहून आणत असलेला गाळ,अनेक प्रकारचे जिवाणू,बुरशी आणि छोटे छोटे कीटक यांच्या दैनंदिन क्रिया, ऊत्सर्जित पदार्थ आणि पिकून खाली पडलेल्या पानांचं गांडूळ,कीटक किंवा काही जिवाणूंमुळे होणारं विघटन,हे सारे घटक माती तयार होण्यास हातभार लावतात.शिवाय मातीच्या कणांमध्ये असलेल्या पोकळीत अडकलेलं पाणी आणि हवा,मातीला क्रियाशील ठेवण्यास मदत करते. मातीमध्ये अनेक खनिजांचे कणही सामावलेले असतात,जे मातीत वनस्पती वाढण्यास मदत करतात.

या उलट धूळ म्हणजे अतिशय लहान आणि कोरडे कण,जे वाऱ्यावर विराजमान होऊन,हवेत अगदी सहज विखुरले जातात.धुळीमध्ये जोराच्या वाऱ्यावर पसरले गेलेले काही मातीचे कण,परागकण, राख किंवा काही ठिकाणी ज्वलनामुळे तयार होणारे बारीकसे कार्बनचे कण अंतर्भूत असतात.शिवाय त्यात काही वस्त्रांचे बारीक तंतू,सजीवांची विष्ठा किंवा त्यांच्या शरीरातून उत्सर्जित होणाऱ्या काही रसायनांचे सूक्ष्म कण असू शकतात.घरातल्या धुळीमध्ये कधी माणसांचे पाळीव प्राण्यांचे केस आणि बाह्यत्वचेचे पडलेले सूक्ष्म कण यांचाही समावेश असतो

# आर.वाय.पी. कला महाविद्यालयाच्या निरोप समारंभात विद्यार्थी भावुक

प्रतिनिधी: प्रदीप पोटफोडे

विहामांडवा : आर.वाय.पी. कला महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने दि. ६ एप्रिल २०२६ रोजी बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देऊन त्यांच्या पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुधाकर गिरे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये प्रा. विकास बेळगे, प्रा. दत्ता साबळे, डॉ. चंद्रकांत जोगदंड तसेच सूत्रसंचालन व संयोजन मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले. यावेळी कु. मानसी जयस्वाल, कु. निकिता रोडगे, कु. अदिती टेकाळे, कु. अश्विनी बढे, निकिता सोहळे, कु. रेणुका बोंबले, विशाल बर्वे, प्राची बनसोडे, कु. रुबिना शेख आदी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत भावनिक वातावरणात आपली मनोगते व्यक्त



केली. मराठी विभाग व महाविद्यालयाविषयी कृतज्ञता व्यक्त करताना "पी.जी.चे शिक्षणही येथेच मिळाले असते तर आनंद द्विगुणित झाला असता," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. "कन्या सासुराशी जाये, मागे परतुनी पाहे..." अशीच विद्यार्थ्यांची अवस्था झाली होती. मराठी विभागाने दिलेला जिव्हाळा आणि महाविद्यालयातील आठवणी आयुष्यभर लक्षात राहतील, असे सांगताना कु. अदिती टेकाळे यांना अश्रू अनावर झाले. मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना त्यांच्या तीन वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांच्या विश्वासामुळे अनेक उपक्रम यशस्वी झाले असून "हा मराठी विभाग विद्यार्थ्यांसाठी कायम माहेरघर राहील," असे त्यांनी सांगितले. तसेच प्रा. दत्ता साबळे व प्रा. विकास बेळगे यांनीही विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देत, "तुमची उणीव महाविद्यालयाला भासत राहील; मात्र तुम्ही उंच भरारी घ्या आणि कधीही थांबू नका," असे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. सुधाकर गिरे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासावर भाष्य करत, "लवकरच पी.जी. शिक्षण महाविद्यालयात सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. महाविद्यालयाची दारे विद्यार्थ्यांसाठी सदैव खुली राहतील," असे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन यशस्वी होऊन महाविद्यालयाचा सन्मान वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांचे आभार मानले. या प्रसंगी डॉ. चंद्रकांत जोगदंड, डॉ. अजय बढे, श्री. दिनेश ससाणे, फेरोज सय्यद, शरीफ शेख, फारूख शेख, ओम नवपुते आदी कर्मचारी तसेच प्रथम व द्वितीय वर्षातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# गॅस टंचाईमुळे नागरिकांचे हाल; तहसील कार्यालयासमोर चुल पेटवून मोदी सरकारचा निषेध

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना

राज्यभर सुरू असलेल्या गॅस टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून, या समस्येविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज दि ०६ रोजी वंचित बहुजन आघाडी कडून शेवगाव तहसील कार्यालयासमोर चुल पेटवून केंद्रातील मोदी सरकारचा निषेध करण्यात आला.

यावेळी कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयासमोर पारंपरिक पद्धतीने चुल पेटवून शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. या आंदोलनाचे नेतृत्व वंचित बहुजन प्रदेश उपाध्यक्ष प्रा किसन चव्हाण यांनी केले. यावेळी मोदी सरकारचे विरोधामध्ये मोठी घोषणाबाजी करण्यात आली. गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असून, अनेक ठिकाणी गॅस उपलब्ध नसल्याने स्वयंपाकाची मोठी अडचण निर्माण झाली आहे.

यावेळी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गॅस टंचाईचा परिणाम केवळ घरगुती जीवनावरच नव्हे, तर हॉटेल व्यवसाय, चहाच्या टपऱ्या, रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेते तसेच लघुउद्योगांवरही झाला आहे. त्यामुळे अनेकांचे रोजगार धोक्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांमध्येही जेवणाची समस्या निर्माण झाली असून, काही विद्यार्थ्यांना घरी परतावे लागत आहे.

तसेच, अनेक ठिकाणी गॅस सिलिंडर काळ्या बाजारात विकले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही ठिकाणी सिलिंडरसाठी ५ ते ७ हजार रुपये मोजावे लागत असल्याचेही समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीने प्रशासनाकडे गॅस टंचाई तात्काळ दूर करावी, काळाबाजार रोखण्यासाठी कडक कारवाई करावी, तसेच नागरिकांना नियमित व पुरेसा गॅस पुरवठा करावा, अशा मागण्या केल्या आहेत. प्रशासनाने या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी ॲड सुभाष लांडे, वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष शेख प्यारेलाल, रमेश खंडागळे, सलीम जिलानी, गणेश गिरी, जीवन अंगरख, सुरेश धोत्रे, सुरेश खंडागळे, सुंदर आल्हाट, नसीर शेख, सागर गरुड तसेच यावेळी महिला कार्यकर्तेही यावेळी उपस्थित होते

# शेख रूक्सार युनुसची पोलिस दलात भरारी;

## सामाजिक चळवळीतील सहका-यांकडून गौरव :- डॉ.गणेश ढवळे





बीड (दि.०८): महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रियेत बीड तालुक्यातील च-हाटा येथील सामाजिक चळवळीतील सहकारी शेख युनुस च-हाटकर यांची मुलगी शेख रूक्सार युनुस हिची पुणे शहर पोलिस दलात निवड झाल्याबद्दल बीड येथील शासकीय विश्रामगृहात बुधवारी (दि.०८) सामाजिक चळवळीतील सहका-यांच्या वतीने सहकुटुंब तिचा व कुटुंबियांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन हृद्य सत्कार करण्यात आला.

बीड शहराजवळील च-हाटा गावातील सर्वसामान्य कुटुंबातील रूक्सार हिने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केले. शारीरिक तंदुरुस्ती, नियमित अभ्यास तसेच लेखी परीक्षेची काटेकोर तयारी करत तिने पोलीस भरती प्रक्रियेतील सर्व टप्प्यांवर यशस्वीपणे मात केली. तिच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातील मुलींसाठी प्रेरणादायी यश — डॉ. गणेश ढवळे

यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "शेख रूक्सार हिने शारीरिक चाचण्या, लेखी परीक्षा आणि मुलाखती अशा सर्व टप्प्यांवर यशस्वी वाटचाल करून ग्रामीण भागातील मुलींसाठी एक आदर्श निर्माण केला आहे. जिद्द, सातत्य आणि मेहनतीच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे तिच्या यशातून स्पष्ट झाले आहे. तिच्या या यशाचा आम्हाला अभिमान आहे."

तसेच, सामाजिक चळवळीतील सहका-याची लेक असल्याने ती सर्वसामान्यांच्या समस्या जाणून घेत कर्तव्य पार पाडेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कुटुंबियांची साथ लाख मोलाची — शेख रूक्सार युनुस सत्कारमूर्ती शेख रूक्सार युनुस हिने आपल्या यशाचे श्रेय कुटुंबातील सदस्यांना देत त्यांच्या मोलाच्या साथीमुळे हे यश मिळाल्याचे सांगितले. भविष्यात सामाजिक चळवळीतील सहका-यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाहीही तिने दिली.

यावेळी शेख युनुस यांनी मुलीच्या सत्काराबद्दल सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमात बाळासाहेब मोरे पाटील (प्रदेशाध्यक्ष, शिवशक्ती-भिमशक्ती विचारमंच, महाराष्ट्र राज्य), माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी, बीड), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक), प्राचार्य डी. जी. तांदळे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य किसानसभा, बीड जिल्हा), नितीन सोनावणे (जिल्हाध्यक्ष, ऑल इंडिया पँथर सेना), किष्किंधा पांचाळ (अध्यक्ष, विश्व कल्याण महिला सेवा भावी संस्था, बीड), आम्रपाली साबळे (मराठवाडा उपाध्यक्ष, अन्याय-अत्याचार-भ्रष्टाचार विरोधी समिती, महाराष्ट्र राज्य), सिताबाई भोसले (महिला जिल्हाध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी) यांसह मान्यवरांनी रूक्सारच्या यशाचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. यावेळी माहिती अधिकार कार्यकर्ते शेख मुबीन, पांडुरंग हराळे, धनंजय सानप, विनेश उबाळे (सरपंच, च-हाटा), रफीक पठाण (जिल्हा उपाध्यक्ष, आम आदमी पार्टी, बीड), हनुमान घोडके, सूर्यकांत ठोकळ (जिल्हा सल्लागार, ऑल इंडिया पँथर सेना, बीड), राजू वाघमारे आदी सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवार तसेच शेख रूक्सार युनुस हिचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो. नं. ८१८०९२७५७२

# शेवगावात अवैध देशी दारू विक्रीविरोधात उपोषणाचा इशारा



अहिल्यानगर/ प्रशांत बाफना

शेवगाव तालुक्यातील शिवाजीनगर परिसरात अवैध देशी दारू विक्री सुरू असल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ दादा काळे यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे. याबाबत त्यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे लेखी निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, शेवगाव शहरातील काही ठिकाणी परवानगी नसताना देशी दारूची खुलेआम विक्री सुरू आहे. यामुळे परिसरातील तरुणांवर वाईट परिणाम होत असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. विशेषतः शिवाजीनगर भागात ही विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

काळे यांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही संबंधितांवर ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे या अवैध व्यवसायावर तात्काळ बंदी घालून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

यासंदर्भात येत्या २ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशारा काळे यांनी दिला आहे. प्रशासनाने वेळेत कारवाई न केल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

दरम्यान, या निवेदनाची प्रत राज्य उत्पादन शुल्क मंत्री, जिल्हाधिकारी तसेच पोलिस अधीक्षक यांनाही देण्यात आली असून, प्रशासन काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे

# मौजे अंधापुरी घाट येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन.!

बीड प्रतिनिधी : बीड तालुक्यातील मौजे अंधापुरी घाट येथे गुरु बंकट स्वामी महाराज यांच्या कृपेने व वै ह.भ.प गिरी महाराज व ज्ञानेश्वर माऊली,सुदाम देव महाराज, गुरुवर्य शांती ब्रह्म रामहरी बाबा यांच्या कृपाशीर्वादाने व ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे व महादेव महाराज (तात्या) यांच्या मार्गदर्शनाखाली व समस्त गावकरी मंडळी अंधापुरी घाट यांच्यावतीने वार शुक्रवार दि.१०/४/ २०२६ रोजी मौजे अंधापुरी घाट येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सात दिवस चालणाऱ्या या सप्ताह निमित्त गावामध्ये रोज वेगवेगळ्या नामांकित कीर्तनकारांचे अमृततुल्य असे किर्तन सेवा होणार आहेत तसेच भजन,प्रवचन,हरिपाठ व हरीजागर असे कार्यक्रम होणार आहेत.

अखंड हरिनाम सप्ताह निमित्त गावामध्ये रोज गावकऱ्यांच्या वतीने व समस्त गावकरी मंडळी




अंधापुरी घाट यांच्यावतीने सप्ताह निमित्त महापंगतीचे आयोजन करण्यात आले असून रोज सकाळ व संध्याकाळ गावामध्ये वेगवेगळ्या महापंगती होणार असून परिसरातील भावीक भक्तांनी,नागरिकांनी व गावकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने याचा लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

अखंड हरिनाम सप्ताह निमित्त वार शुक्रवार,दि.१७/४/२०२६ रोजी श्री गुरुवर्य ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे (मठाधिपती बंकट स्वामी संस्थान निनगुर,आळंदी,पंढरपूर) यांचे सकाळी ११ ते १ या वेळेत अमृततुल्य असे काल्याचे किर्तन होणार असून नंतर लगेचच महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे तरी परिसरातील जास्तीत जास्त भाविक भक्तांनी व नागरिकांनी तसेच गावकऱ्यांनी काल्याच्या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे गावकऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# रिजवान शेख यांची अहमदनगर

## ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी निवड

अहमदनगर,/जिल्हा प्रतिनिधी प्रशांत बाफना : सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेच्या कार्यकारिणी विस्ताराच्या अनुषंगाने विविध पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. या नियुक्त्यांमध्ये रिजवान शेख यांची अहमदनगर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून, त्यांच्या निवडीबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



संघटनेच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या पत्रानुसार, या नियुक्त्या संघटनेच्या विस्तार आणि बळकटीकरणाच्या दृष्टीने करण्यात आल्या आहेत. नवीन पदाधिकाऱ्यांवर सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच संघटनेच्या माध्यमातून सदस्य नोंदणी वाढविणे, समाजातील विविध प्रश्नांवर काम करणे आणि मुख्य कार्यकारिणीशी समन्वय ठेवून अहवाल सादर करणे, अशा जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.

रिजवान शेख यांच्या निवडीमुळे अहमदनगर ग्रामीण भागात संघटनेचे कार्य अधिक गतिमान होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पुढील कार्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा देण्यात येत आहेत

## गोकुळसिंग राजपूत यांचा प्रामाणिकतेचा आदर्श: बँकेतील चुकलेले 20 हजार रुपये परत..



सोयगाव ता..
प्रतिनिधी सुनील चोरमले..
...
सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे प्रामाणिकतेचा एक अद्भुत नमुना उभा राहिला आहे. जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत यांनी बँकेच्या तांत्रिक चुकमुळे चुकून मिळालेले २० हजार रुपये प्रामाणिकपणे परत केले. दि. ६ एप्रिल २०२६ रोजी, सावळदबारा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या बी.सी. केंद्रावर, पोलीस पाटील विलास कुल्ले यांच्या मार्फत गोकुळसिंग राजपूत यांनी १० हजार रुपये मागितले होते. मात्र, तांत्रिक त्रुटीमुळे १० हजार रुपये खात्यात जमा झाले आणि १० हजार रुपये रोख दिले गेले. त्यामुळे एकूण २० हजार रुपये मिळाले.
रात्री मेसेज तपासल्यानंतर हे लक्षात येताच, गोकुळसिंग राजपूत यांनी प्रामाणिकपणे पुढाकार घेतला आणि दुसऱ्या दिवशी बँकेत जाऊन, पोलीस पाटील विलास कुल्ले यांना बोलावून, शाखा व्यवस्थापक प्रशांत फुसे यांच्या साक्षीने २० हजार रुपये परत केले.
या प्रसंगाने पुन्हा एकदा दाखवून दिलं आहे की, आजही प्रामाणिकता आणि माणुसकी जिवंत आहेत.
पत्रकारितेतील नैतिकतेचे प्रतीक म्हणून गोकुळसिंग राजपूत यांचे कौतुक सर्वत्र होत आहे.

# शिवरामपुरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित विडाला 30 लाखांचा नफा..

### पतसंस्थेत ६० कोटींच्या ठेवी तर ५० कोटींचे कर्ज वाटप चेअरमन बाबासाहेब मुळे यांची माहिती..

केज ! प्रतिनिधी विडा येथिल शिवरामपुरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेत ६० कोटींच्या ठेवी असून त्यापैकी पतसंस्थेने एकूण ५० कोटींचे कर्ज वाटप केले आहे. पतसंस्थेने २३ कोटींची गुंतवणूक केली आहे.पतसंस्थेकडे सध्या ४ कोटींचा स्वनिधी आहे.दरम्यान पतसंस्थेला चालू आर्थिक वर्षात ३० लाखांचा निव्वळ नफा झाला आसून पतसंस्थेच्या विडा,सारूळ(बरड),चिंचोली माळी,येवता ,वाघेबाभूळगाव,नेकनूर,धारूर,केज,युसूफवडगाव,वडवणी,चौसाळा येथे एकूण ११ शाखा कार्यरत आहेत.तसेच पतसंस्था लवकरच ७० कोटींच्या पुढे वाटचाल करणार असल्याची माहिती पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुळे यांनी दिली आहे.
बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे यांनी विडा येथे शिवरामपुरी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची स्थापना केली होती.पतसंस्थेने कृष्णा को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे व युवा नेते अतुल दादा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राहकांचा विश्वास संपादन करत यशस्वीरित्या वाटचाल केली आहे.त्यामुळे पतसंस्थेने अत्यंत अल्पावधीत ग्राहकांच्या विश्वासाच्या बळावर उत्तुंग भरारी घेतली असून पतसंस्थेने ६० कोटींच्या पुढे वाटचाल केली आहे.
पतसंस्थेला उत्तम व्यवस्थापना बद्दल विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.पतसंस्थेचे सर्व संचालक मंडळ,खातेदार,ठेवीदार,सभासद,हितचिंतक व ग्राहकांच्या विश्वासाच्या बळावर पतसंस्थेला चालू आर्थिक वर्षात ६० कोटींच्या ठेवी प्राप्त झाल्या असून त्यापैकी पतसंस्थेने ५० कोटींचे कर्ज वाटप केले आहे.यामाध्यमातून पतसंस्थेने कर्जदारांना विविध व्यवसाय उभारून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत केली आहे.दरम्यान पतसंस्थेला चालू आर्थिक वर्षात ३० लाखांचा निव्वळ नफा मिळाला आहे.पतसंस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुनीता पवार उपमुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चौरे सर्व शाखेचे शाखा व्यवस्थापक,सर्व शाखेचे कर्मचारी यांनी उत्तम कर्तव्य बजावत आसून पतसंस्था लवकरच ७० कोटींच्या पुढे वाटचाल करणार असल्याची माहिती पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुळे यांनी दिले आहे.

## शिदोड मध्ये उद्या पुरुषोत्तम महाराज पाटील यांचे कीर्तन

### तर रविवार 12 एप्रिल रोजी श्री हभप महंत स्वामी योगीराज महाराजांचे काल्याचे कीर्तन !

**शिदोड आणि परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे- आवाहन**

बीड (प्रतिनिधी)-श्री क्षेत्र रामगडाच्या वतीने शिदोड नगरीत सुरू असलेल्या भव्य 47 व्या नारळी सप्ताहात उद्या दि. ९ एप्रिल २०२६ रोजी रात्री श्री ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील (बुलढाणा) यांचे कीर्तन सेवा संपन्न होणार आहे. तर १२ एप्रिल२०२६ रोजी श्री ह.भ.प.महंत स्वामी योगीराज महाराजांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. तरी शिदोड आणि शिदोड परिसरातील भाविकांनी या कीर्तन कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे आवाहन सप्ताह आयोजक आणि समस्त शिदोड ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात येत आहे.



श्री क्षेत्र रामगडाच्या वतीने बीड तालुक्यातील शिदोड नगरीत ५ एप्रिल२०२६ पासून भव्य नारळी सप्ताहाला उत्साहात प्रारंभ झाला असून, सप्ताहा दरम्यान दररोज विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या सप्ताहाला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. मंगळवार दि. ७ एप्रिल रोजी श्री ह.भ.प. इंदोरीकर महाराज यांचे कीर्तन भक्तिमय वातावरणात पार पडले. त्या नंतर दि. ८ एप्रिल २०२६ रोजी श्री ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे यांचे कीर्तन संपन्न होणार आहे. दि. ९ एप्रिल रोजी ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणा यांची कीर्तन सेवा होणार आहे. शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ रोजी श्री ह भ प वेदांताचार्य जयवंत महाराज बोधले यांची कीर्तन सेवा तर शनिवार ११ एप्रिल २०२६ रोजी श्री ह भ प विदर्भ रत्न संजय महाराज पाचपोर यांचे कीर्तन संपन्न होणार आहे. रविवार दिनांक १२ एप्रिल२०२६ रोजी श्री ह. भ. प.प.पू. गुरुवर्य महंत स्वामी योगीराज महाराज मठाधिपती (श्री क्षेत्र संस्थान रामगड थोरला गड) यांचे दुपारी १२ ते ०२ या वेळेत अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल व त्यानंतर महाप्रसादाच वाटप करण्यात येणार आहे. या कीर्तनाचा व काल्याच्या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी शिदोड आणि शिदोड परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सप्ताह आयोजक व समस्त शिदोड ग्रामस्थांनी केले आहे.

# पुण्यातील प्रसिद्ध वॉटपार्कमध्ये भयानक दुर्घटना;

### पर्यटक महिलेचे अर्धे शरीर कायमस्वरूपी निकामी

पुणे/प्रशांत बाफना : सध्या सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला आहे. अनेकजण कडक उन्हापासून थंडावा मिळवण्यासाठी वॉटरपार्कला पंसती देतात. यामुळे मुंबई प्रमाणे पुण्यातील वॉटरपार्कमध्ये देखील पर्यटकांची गर्दी होत आहे.

अशातच पुण्यातील प्रसिद्ध वॉटपार्कमध्ये भयानक दुर्घटना घडली आहे. वॉटर स्लाइडवरुन स्लायडिंग करणाऱ्या पर्यटक महिलेचे अर्धे शरीर कायमस्वरूपी निकामी झाले आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. तसेच वॉटरपार्कच्या सुरक्षेबाबत देखील प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

पुण्यातीस एका प्रसिद्ध वॉटरपार्कमध्ये सहलीसाठी आलेल्या महिलेचा वॉटर स्लाइडवर अपघात झाला. यात महिलेचे अर्धे शरीर निकामी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी वॉटरपार्क प्रशासनाविरोधात शिरुर पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी वॉटरपार्कचा पंचनामा केला आहे.
अश्विनी संदीप नप्ते (वय 37) असे अपघाताग्रस्त महिसेले नाव आहे. अश्विनी या करंदी येथे राहणाऱ्या आहे. अश्विनी या आपल्या कुटुंबासह मोराची चिंचोली येथील जय मल्हार कृषी पर्यटन केंद्र वॉटरपार्कमध्ये सहलीसाठी गेल्या होत्या. वॉटर स्लाइडवरून घसरताना पाण्याची पातळी अत्यंत कमी असल्याने त्या जोरात खाली आपटल्या आणि बेशुद्ध पडल्या. घटनेनंतर तातडीची वैद्यकीय सुविधा किंवा रुग्णवाहिका उपलब्ध नसल्यामुळे नातेवाईकांनी त्यांना खाजगी रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल केले.
तपासणीत त्यांच्या पाठीचे चार मणके तुटल्याचे समोर आले असून डॉक्टरांनी त्यांचे अर्धे शरीर कायमस्वरूपी निकामी झाल्याचे स्पष्ट केले आहे. या गंभीर प्रकारामुळे वॉटरपार्कमधील सुरक्षेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. किरण नप्ते यांच्या फिर्यादीवरून शिरूर पोलीस ठाण्यात वॉटरपार्कचे मालक व व्यवस्थापकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
वॉटर पार्कमध्ये बुडून दोन तरुणांचा मृत्यू झाला
काही दिवसांपूर्वी नागपूरच्या क्रेझी कॅसल वॉटर पार्कमध्ये बुडून दोन तरुणांचा मृत्यू झाला होता. 21 वर्षांचा सागर सहस्त्रबुद्धे आणि 19 वर्षांचा अक्षय बिंड यांचा मृत्यू झाला. तर नेहल मोटघरे हा २१ वर्षांचा तरुण अत्यवस्थ झाला होता. या वॉटर पार्कमध्ये ज्या ठिकाणी कृत्रिम लाटा तयार केल्या जातात, तिथे हे तिघेही खेळत होते. तिथेच या दोघांचा बुडून मृत्यू झाल्याचं सांगण्यात आले.. धक्कादायक बाब म्हणजे वॉटर पार्क मध्ये ही दुर्दैवी घटना घडल्यानंतर ही दुपारी चार वाजेपर्यंत वॉटर पार्क आणि घटना घडलेले पूल तसेच सुरु ठेवण्यात आले होते

### अनुभवाचे बोल -

आजच्या काळात 'सॉरी' आणि 'थँक्स' हे शब्द शिष्टाचाराचा भाग झाले आहेत. एखाद्याला धक्का लागला की आपण लगेच सॉरी म्हणतो, पण त्या व्यक्तीला झालेल्या त्रासाची आपल्याला खरोखर जाणीव असतेच असे नाही. तसेच, समोरच्याने साधे पाणी दिले तरी थँक्स म्हणतो, पण त्यात कृतज्ञतेपेक्षा ती एक 'फॉर्मॅलिटी' जास्त वाटते. जवळच्या नात्यांमध्ये जेव्हा आपण फक्त शब्दांचा वापर करतो, तेव्हा ती नाती कोरडी वाटू लागतात. तिथे शब्दांपेक्षा डोळ्यांतील भाव आणि वर्तनातील आपुलकी जास्त महत्त्वाची ठरते. जेव्हा शब्द संपतात आणि कृती सुरू होते, तेव्हाच खऱ्या अर्थाने नात्यातली किंवा माणसांमधली विश्वासार्हता टिकते. नाहीतर हे शब्द फक्त संवादातील 'फुलस्टॉप' बनून राहतात. म्हणून आपण कोणासाठी काहीही करू न शकणे, हे समजू शकते, पण त्या अगतिकतेला केवळ शब्दांनी झाकण्यापेक्षा ती प्रामाणिकपणे मान्य करणे जास्त मोलाचे असते..!

तक्षशील सौ. उषा घोडेस्वार, संचालिका
उज्वल व्यसनमुक्ती केंद्र, साकोली

# अभिषेक कळमकर पुन्हा अडचणीत; भलताच कुटाना समोर, काय घडलं पहा..

### नोकरीचे आमिष दाखवून युवतीवर अत्याचार / अभिषेक कळमकरवर अत्याचाराचा दुसरा गुन्हा

अहिल्यानगर | प्रशांत बाफना
नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका २७ वर्षीय युवतीवर कारमध्ये अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी पीडितेने दिलेल्या फिर्यादीवरून माजी महापौर अभिषेक कळमकर याच्याविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, मे २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पीडित युवतीची ओळख अभिषेक कळमकर याच्याशी झाली होती. युवतीने ती बेरोजगार असल्याचे सांगितल्यावर कळमकर याने तिला नोकरीसाठी मदत करण्याचे आश्वासन देत तिचा भ्रमणध्वनी क्रमांक घेतला होता. त्यानंतर जुलै २०२४ मध्ये त्याने युवतीला संपर्क साधून शोरूममध्ये काम देण्याच्या बहाण्याने बेलेश्वर मंदिर परिसरातील पाथर्डी रस्त्यावर बोलावून घेतले.

पीडिता तिथे पोहोचल्यानंतर कळमकर याने तिला स्वतःच्या कारमध्ये बसवले. नगर लबच्या पुढे निर्जन ठिकाणी कार उभी करून त्याने तिला पिण्यासाठी पाण्याची बाटली दिली. पाणी पिल्यानंतर पीडितेला भुरळ आली. आरोपीने तिला नोकरीचे आमिष दाखवून तिच्या इच्छेविरुद्ध कारमध्येच अत्याचार केला. या कृत्यानंतर त्याने



पीडितेला धमकावून सोडून दिले.काही दिवसांनी आरोपीने पुन्हा संपर्क साधून पीडितेकडे भेटीची मागणी केली. तिने नकार दिला असता, त्याने कारमधील घटनेचे छायाचित्र आणि चित्रफीत समाजमाध्यमावर प्रसारित करण्याची धमकी दिली. तसेच, भेटायला न आल्यास जीवे मारण्याचीही भीती घातली. सामाजिक दबावामुळे आणि भीतीपोटी पीडितेने इतके दिवस मौन पाळले होते. मात्र, आरोपीवर इतरही गुन्हे दाखल झाल्याचे समजताच पीडितेने हिंमत करून पोलिसांत धाव घेतली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत

## आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत शिवसेना बीड जिल्हा आढावा बैठक!

**पदाधिकारी-शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे- जगताप, मुळूक, गलधर, नवले**



बीड, प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. ना.श्री. एकनाथजी शिंदे साहेब, संसदररत्न खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब तसेच शिवसेना सचिव श्री. संजयजी मोरे साहेब यांच्या आदेशानुसार, महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री तथा शिवसेना मराठवाडा संपर्कप्रमुख मा.ना. श्री. प्रकाशजी अबिटकर साहेब आणि शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव श्री अशोकजी पटवर्धन साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि शिवसेना बीड लोकसभा संपर्कप्रमुख श्री. मनोजजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली दि. 9 एप्रिल 2026 दु. 1:30 वाजता
बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा, बार्शी रोड येथे शिवसेना जिल्हा आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे

शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी जिल्हा आढावा बैठकीत बीड जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच आगामी राजकीय रणनीती, संघटन विस्तार आणि विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार असून काही महत्त्वाचे निर्णयही घेतले जाणार आहेत. शिवसेना, युवासेना, महिला आघाडी तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शिवसैनिक आणि बूथ प्रमुखांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर आणि जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांनी केले आहे.

# सिल्लोड व सोयगाव विधानसभा आमदार अब्दुल सत्तार यांची आरोग्य मंत्री यांच्या निवासस्थानी भेट..

### आरोग्य सुविधांसाठी सिल्लोड–सोयगाव मतदारसंघाला बळकटी देणार – आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांची ग्वाही..

सोयगाव ता..
प्रतिनिधी सुनील चोरमले..
... मुंबईत शासकीय निवासस्थानी भेट; उपजिल्हा रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या समस्यांवर सविस्तर चर्चा
मुंबई येथे प्रकाश आबीटकर यांची त्यांच्या शासकीय निवासस्थानी आमदार अब्दुल सत्तार यांची . या भेटीदरम्यान सिल्लोड–सोयगाव विधानसभा मतदारसंघातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम व बळकट करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.
यावेळी विधिमंडळातील सहकारी प्रदीप जैस्वाल तसेच आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत सिल्लोड येथील 100 खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, सोयगाव येथील 50 खाटांचे रुग्णालय यांच्यासह फर्दापूर,सावळदबारा अंभई, अजिंठा, भराडी, गेवराई सेमी आणि अंधारी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमधील



विविध अडचणींची मुद्देसूद मांडणी करण्यात आली.

या भागातील मनुष्यबळाची कमतरता, आवश्यक पदनिर्मिती, तसेच मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. यावर सकारात्मक भूमिका घेत आरोग्यमंत्री आबीटकर यांनी लवकरच संबंधित विभागीय अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेऊन आवश्यक निर्णय घेतले जातील, असे आश्वासन दिले.

# युद्धविरामानंतर इस्त्रायलचा भीषण हल्ला, थेट 50 फायटर जेट मैदानात

## मैदानात, एकाचवेळी 160 बॉम्ब हल्ले, अनेकांचा मृत्यू

अमेरिका इस्त्रायल आणि इराणमध्ये भीषण युद्ध सुरू होतं, अखेर युद्धाच्या 40 व्या दिवशी युद्धविराम झाला आहे. बुधवारी इराण आणि अमेरिकेकडून युद्धविरामाची घोषणा करण्यात आली. इस्त्रायलने देखील अमेरिकेला समर्थन देताना युद्धविराम झाल्याचं सांगितलं. अमेरिका आणि इराणकडून दोन आठवड्याच्या युद्धविरामाला मान्यता देण्यात आली. या दरम्यान अमेरिका आणि इराणमध्ये चर्चा होणार आहे. इराणने स्ट्रीट ऑफ होर्मूज तातडीने खुला करावा अशी अट अमेरिकेनं इराणसमोर ठेवली होती. इराणने ती अट देखील मान्य केली आहे. दरम्यान या युद्धविरामासाठी पाकिस्तानने पुढाकार घेतला होता. युद्धविराम होऊन अजून 24 तास देखील झाले नाहीत,



तोच आता मोठी बातमी समोर आली आहे. पाकिस्तानने जेव्हा इराण, इस्त्रायल आणि अमेरिकेपुढे युद्धविरामाचा प्रस्ताव ठेवला होता, तेव्हा त्यामध्ये इस्त्रायल लेबनॉनवर देखील हल्ले करणार नाही, अशी एक अट होती. मात्र इस्त्रायलने पाकिस्तानची ही अट फेटाळून लावली आहे. आमचा युद्धविराम हा फक्त इराणशी आहे, आम्ही लेबनॉनवर हल्ले सुरूच ठेवणार असं इस्त्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी म्हटलं होतं. युद्धविरामाची घोषणा झाल्यानंतर अवघ्या 24 तासांमध्येच इस्त्रायलने लेबनॉनवर भीषण हल्ला केला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार इस्त्रायलने 50 फायटर जेटच्या मदतीने लेबनॉनवर भीषण हल्ला केला आहे. यावेळी इस्त्रायलकडून तब्बल 160 बॉम्ब हल्ले करण्यात आले असून, हिज्बुल्लाहाच्या ठिकाणांना टार्गेट करण्यात आलं. इस्त्रायलच्या या हल्ल्यामध्ये 100 पेक्षा अधिक हिज्बुल्लाह संघटनेचे सदस्य मारले गेल्याची माहिती समोर येत आहे. या हल्ल्यामध्ये लेबनॉनचे अनेक सामान्य नागरिक मारले गेल्याची माहिती देखील समोर येत आहे. अनेक जण या हल्ल्यात जखमी झाले आहेत. हा हल्ला एवढा भीषण होता की, आता लेबनॉनचे पंतप्रधान नवाफ सलाम यांनी या हल्ल्याविरोधात आपल्या मित्र राष्ट्रांची मदत मागितली आहे. आम्ही युद्धविरामाचं स्वागत करतो, परंतु इस्त्रायलचे आमच्यावर हल्ले सुरूच आहेत. हे हल्ले थांबवण्यासाठी आम्हाला मदत करा असं साकडं आता लेबनॉनच्या पंतप्रधानांनी आपल्या मित्र राष्ट्रांना घातलं आहे, तर दुसरीकडे इराणने देखील लेबनॉनवरील हल्ले थांबवण्याची मागणी केली आहे, जर हल्ले थांबले नाहीत तर आम्ही युद्धविराम तोडू अशी धमकी देखील त्यांनी दिली आहे. त्यामुळे आता हे युद्ध पुन्हा एकदा भडकण्याची शक्यता आहे.

## बीड शहर रिपाइंच्या वतीने 12 एप्रिल रोजी ईद-मिलाफचा कार्यक्रम आयोजित:पप्पू कागदे

बीड/प्रतिनिधी
हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतिक असलेल्या पवित्र रमजान ईदचे औचित्य साधून सामाजिक एकोपा जोपासण्या साठी आणि हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी बीड शहर रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रविवार दि. 12 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी 5 ते रात्री 8 या वेळेत बशीर गंज चौक बीड येथे ईद-ए-मिलाफ (मिलन) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



रमजान ईदचे औचित्य साधून हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी व सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी रविवार दि. 12 एप्रिल 2026 रोजी बीड शहर रिपाइंच्या वतीने बशीर गंज चौक बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या ईद मिलाफ (मिलन) च्या कार्यक्रमास हिंदू-मुस्लिम बांधवांनी उपस्थित रहावे. असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, राजू जोगदंड, मझरखान, किसन तांगडे, शेख रोहील (नगरसेवक), मसुद खान (नगरसेवक), रमेश गंगाधरे, सिद्धिक फारोखी, सुलतान बाबा, रफिक भाई (फिटर), सादिक पठाण, रणजित शिनगारे, मुबीन जुबेरी,शेख अजीम (मामु), फरहान बागवान आदींनी केले आहे.

# महापुरुषांच्या विचारांचा रंगोत्सव

## चित्रकला स्पर्धेतून विद्यार्थ्यांची सर्जनशील अभिव्यक्ती

बीड प्रतिनिधी
महापुरुष चित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त आणि अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.या स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी केवळ रंगरेषांमध्ये चित्रे रेखाटली नाहीत, तर महापुरुषांच्या विचारांचे जिवंत प्रतिबिंब साकारले.
बीड शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती निमित्ताने जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.त्याअनुषंगाने बुधवारी (दि.8) रोजी महापुरुष चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जी.के.जाधव उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून गजानन चित्रे, अनिल डोळस, गौतम सोनवणे, डी. जी. वानखेडे, परिक्षक विशाल गायकवाड, संपादक विनोद शिंदे यांनी उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांचे कौतुक केले व मार्गदर्शन केले. महापुरुषांच्या




महान व्यक्तिमत्त्वांचे प्रभावी चित्रण करताना विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि सामाजिक जाणिवेला विशेष उंची मिळाल्याचे दिसून आले. प्रत्येक चित्रामागे एक विचार, एक प्रेरणा आणि एक संदेश दडलेला होता.या उपक्रमामागचा उद्देश विद्यार्थ्यांच्या मनात महापुरुषांविषयी आदर, कृतज्ञता आणि त्यांच्या विचारांचे संस्कार रुजवणे हा असून, स्पर्धेच्या माध्यमातून नव्या पिढीला प्रेरणेचा ठेवा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.या स्पर्धेत संघवी जोगदंड (प्रथम), ज्योत्सना विद्यागर (द्वितीय), उमंग विद्यागर (तृतीय), समिक्षा सोनवणे (उत्तेजनार्थ), प्रियांश ससाणे (उत्तेजनार्थ), पौर्णिमा तांगडे (उत्तेजनार्थ) यांनी क्रमांक पटकाविला.
या चित्रकला स्पर्धेचे प्रास्ताविक ॲड.तेजस वडमारे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड.राजेश शिंदे,
प्रा.पांडुरंग सुतार यांनी प्रभावीपणे पार पाडले, तर आभार प्रदर्शन तानाजी शिनगारे यांनी केले.
स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती प्रमुख सुमेध जोगदंड व पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

# विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी सुवर्णसंधी;

## आरूष अबॅकस क्लासेसची 15 ते 20 एप्रिलदरम्यान मोफत कार्यशाळा

### आरुष अबॅकस क्लासेस ने आयोजित केलेल्या मोफत कार्यशाळेचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा–प्रा.अविनाश जगताप

किल्ले धारूर /प्रतिनिधी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व बौद्धिक विकासासाठी आरूष प्रोॲक्टिव्ह अबॅकस क्लासेसतर्फे एक अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.१५ ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत मोफत अबॅकस कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून, विद्यार्थ्यांसाठी ही एक मोठी संधी मानली जात आहे. या कार्यशाळेत अबॅकसची सखोल माहिती, त्याचा वापर व उपयुक्तता याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच ११ ते ९९ पर्यंतचे पाढे सोप्या व प्रभावी पद्धतीने तयार करण्याचे तंत्र शिकवले जाणार आहे. यासोबतच बेरीज, वजाबाकी, गुणाकार यांसारख्या गणिती क्रियांसाठी जलद व सोप्या ट्रिक्सही विद्यार्थ्यांना शिकवल्या जाणार आहेत. संख्यांचा वर्ग काढण्याच्या सोप्या पद्धतींचेही



प्रशिक्षण देण्यात येणार आहे. कार्यशाळेत मेंदूचा विकास साधण्यासाठी विविध ॲक्टिव्हिटींचा समावेश करण्यात आला आहे.





अबॅकसच्या नियमित सरावामुळे विद्यार्थ्यांचे कॉन्सन्ट्रेशन, रीडिंग स्पीड, रायटिंग स्पीड आणि अचूकता वाढण्यास मोठी मदत होते. यामुळे शालेय शिक्षणातही विद्यार्थ्यांची प्रगती अधिक वेगाने होऊ शकते, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. ही कार्यशाळा पूर्णपणे विनामूल्य असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आरुष प्रोॲक्टिव्ह अबॅकस क्लासेस किल्ले धारूर चे संचालक प्रा.अविनाश जगताप व संचालिका शितल जगताप यांनी केले आहे, इच्छुक पालकांनी आपल्या पाल्यांची नोंदणी करण्यासाठी तात्काळ .ठिकाण: नगर परिषद जवळ, किल्ले धारूर
संपर्क: 8766778383 / 9834722298 वर संपर्क साधावा असे आवाहन देखील केले आहे.

## माजलगाव तालुक्यातील 5610 शेतकऱ्यांना दिलासा

### – 3 कोटीपेक्षा अधिक रक्कम खात्यात जमा :- नुमान चाऊस

माजलगाव (प्रतिनिधी) – माजलगाव तालुक्यातील शेतकरी राशन कार्ड धारकांचा दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रश्न अखेर मार्गी लागला असून, रखडलेली रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. या निर्णयामुळे हजारो शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे.



या प्रकरणात एकूण ५६१० लाभार्थ्यांना लाभ मिळाला असून, एकूण ₹३,०९,५४,९६० (तीन कोटी नऊ लाख चौपन्न हजार नऊशे साठ रुपये) इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.

या यशामध्ये आमदार प्रकाश दादा सोळंके व जयसिंग भैय्या सोळंके यांच्या ठाम भूमिकेचा मोठा वाटा आहे. तसेच मौलाना आझाद युवा मंच यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय शक्य झाला असल्याचे सांगण्यात येत आहे.

यासंदर्भात जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी सांगितले की, “ही फक्त सुरुवात असून, पुढील काळातही जनतेच्या हक्कासाठी आमचा लढा कायम सुरू राहील.”

या यशस्वी प्रयत्नासाठी सर्व सहकारी व संबंधित अधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

# वीज विभाग झोपेत, नागरिक अंधारात! — नाईट ड्युटी लाईनमनचा कारभार उघड

## इंजिनियरांचा धाक नाही? नाईट ड्युटी लाईनमेनवर कारवाईची मागणी...

### फ्युज उडाल्यावर नागरिक दोन तास अंधारात; भगवान बाबा डीपीवर वीजपुरवठ्याचा बोजवारा

बीड / प्रतिनिधी :
शहरातील भगवान बाबा डीपी परिसरात वीजपुरवठ्याचा अक्षरशः बोजवारा उडाल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. दिवस असो किंवा रात्र, या डीपीवरून वीजपुरवठा वारंवार खंडित होत असून एका दिवसात तब्बल 20 ते 25 वेळा लाईट चालू-बंद होत असल्याचा संतप्त आरोप नागरिकांनी केला आहे.
नागरिकांच्या म्हणण्यानुसार, बुधवारी दिवसभर वीजपुरवठा खंडित राहिल्याने परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. घरगुती कामे, व्यवसाय तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर त्याचा मोठा परिणाम झाला.
दिवसभर वीज नसल्याने नागरिक आधीच त्रस्त असताना रात्री फ्युज उडाल्यानंतर नाईट शिफ्टवरील लाईनमनला अनेक वेळा फोन करण्यात आला. मात्र फोन उचलला गेला नाही. काही वेळाने फोन उचलल्यानंतर “पाच मिनिटांत येतो” असे सांगण्यात आले. मात्र प्रत्यक्षात फ्युज दुरुस्तीसाठी तब्बल दोन तास लागल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे नागरिकांना अंधारात बसण्याची वेळ आली.
या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. “नाईट ड्युटी म्हणजे सेवा की आराम?” असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. नाईट ड्युटीवर असलेल्या कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम न केल्यास नागरिकांनी न्याय मागायचा तरी कुणाकडे, असा प्रश्नही विचारला जात आहे.
दरम्यान, संबंधित वीज विभागाच्या अभियंत्यांनी या प्रकाराची तातडीने चौकशी करून निष्काळजीपणा करणाऱ्या लाईनमनवर कडक कारवाई करावी तसेच भगवान बाबा डीपीवरील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. अन्यथा संतप्त नागरिक आंदोलनाचा इशारा देत आहेत.



This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com